उपक्रम

## पिंपळगाव बसवंतला राज्यस्तरीय कार्यशाळा

# मधमाशी पालनासाठी केंद्र सरकारने निधी द्यावा

### डॉ. कैलास मोते यांचे प्रतिपादन



**मधमाशी पालनाच्या प्रसारकार्याबद्दल श्री. संजय पवार यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करताना डॉ.श्री. कैलास मोते. समवेत कृषी अधिकारी श्री. गोविंद हांडे, श्री. प्रवीण गवांदे, श्री. ठाकूर, डॉ.श्री. बी.बी. पवार, डॉ.श्री. तुकाराम निकम, श्री. बर्वे, श्री. विवेक सोनवणे आदी मान्यवर.**

**पिंपळगाव (बसवंत)** : देशात जास्तीत जास्त मधमाशीपालन केंद्रे उभारली जावीत यासाठी केंद्र सरकारकडून विशेष कार्यक्रम राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भरीव अनुदान देण्याची मागणी केंद्र सरकारकडे आपण करणार असल्याचे प्रतिपादन राज्याच्या कृषी आयुक्तालयाचे संचालक डॉ.श्री. कैलास मोते यांनी केले.

पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथील मुखेड रोडवरील बसवंत गार्डनमध्ये गेल्या महिन्यात, दि. १३ फेब्रुवारी रोजी आयोजित राज्यस्तरीय मधमाशीपालन प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना डॉ. मोते यांनी समर्पक उत्तरे दिली. देशात मधमाशीपालनाला प्रोत्साहन देणे, हा या कार्यशाळेचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उत्तर महाराष्ट्रातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह 'पूर्वा परिवारा'चे मार्गदर्शक डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार, डॉ.श्री. तुकाराम निकम, 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार, टेक्निकल डायरेक्टर डॉ.श्री. भास्कर गायकवाड, कृषी आयुक्तालयाचे उपसंचालक श्री. प्रवीण गवांदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. विवेक सोनवणे तसेच श्री. महेश पाटील, श्री. संदीप वाघ यांबरोबरच राज्यातून आलेले विविध कृषी विज्ञान केंद्रांचे प्रतिनिधी, मधमाशी तज्ञ, मधमाशी उद्योजक, शेतकरी, महिला आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.श्री. भास्कर गायकवाड म्हणाले की, महाराष्ट्रात मधमाशी पालनासाठी सकारात्मक वातावरण आहे. मधल्या कालखंडात कृषी विभाग आणि मधमाशी पालनातील समन्वय तुटला होता. या बाबतीत उत्तर प्रदेशपेक्षा आपल्याकडे परिस्थिती चिंताजनक आहे. आजही महाराष्ट्रात मधमाश्यांच्या जाती उत्तर भारतातून आणाव्या लागतात, ही दुर्दैवाची बाब आहे. त्यातल्या त्यात गांडूळ आणि मधमाशीचे महत्त्व अलीकडे वाढले आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र तरीही मधमाशीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन आज चुकत आहे. मधमाशी आणि




**'बसवंत गार्डन'मध्ये झालेल्या राज्यस्तरीय मधमाशी पालन कार्यशाळेत डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार यांना पुष्पगुच्छ देऊन गौरविताना डॉ.श्री. कैलास मोते. समवेत डॉ.श्री. भास्कर गायकवाड, कृषी अधिकारी श्री. गोविंद हांडे, श्री. विवेक सोनवणे, श्री. प्रवीण गवांदे, डॉ.श्री. तुकाराम निकम, श्री. संजय पवार आदी मान्यवर.**

शेती यांचे परस्पर योगदान महत्त्वाचे आहे. मधमाशी पालन वाढले तरच कृषी उत्पादन वाढेल. कापसाचे २२ टक्के उत्पादन मधमाशीमुळे वाढते. राज्यातील १७५ लाख हेक्टरपैकी ५० लाख हेक्टरचा विचार केला तरी मधाचे तसेच पिकांचे चांगले उत्पादन मिळेल, असा आशावादही डॉ.श्री. गायकवाड यांनी व्यक्त केला.

आपले मनोगत व्यक्त करताना फलोत्पादन विभागाचे सल्लागार समन्वयक श्री. गोविंद हांडे म्हणाले की, मधमाशीपालनासाठी महाराष्ट्राची स्ट्रेंग्थ चांगली आहे. तरुणांनी उद्योजक होण्यासाठी पुढे यावे. अडचणी सांगितल्या तर त्यावर मात होऊ शकते. इतर राज्यांत, जिल्ह्यांत काय चालू आहे ते यातून समजते. जसा वापर करू तसा फायदा होतो. आंबा, डाळिंब, केळी, कांदा पिकांबाबत माहिती मिळवण्याचे काम सुरू आहे. तयार झालेल्या उत्पादनाला चांगली मागणी आहे. परदेशातील ग्राहकांप्रमाणे स्थानिक ग्राहकांना रेसिड्यू फ्री द्राक्षे उपलब्ध करून देण्यासाठी ५० हजार शेतकऱ्यांची नोंदणी केली आहे. व्यवसाय करताना ध्येय महत्त्वाचे आहे. केंद्र व राज्य सरकारने यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. निर्यातीबाबत विचार करणे गरजेचे आहे. करोनानंतर मधाची मागणी जगभरात वाढली आहे. त्यावर सातत्याने काम केल्यास इतर पिकांप्रमाणेच मध निर्यातीतही नवी ओळख निर्माण होऊ शकते. प्रकल्प छोटा असला तरी नोंदणीसाठी योग्य नियोजन केल्यास काम सुकर होईल. तयार मालाची तपासणी करून-रेसिड्यू फ्री मधाची चाचणी करून मालाची गुणवत्ता निश्चित करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

कीटकनाशके ही मधमाशीसाठी खूप घातक आहेत. यामुळे दरवर्षी सुमारे १० हजार वसाहती नष्ट झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याकरिता मधमाशीविषयी जनजागृती व्हावी म्हणून कार्यशाळा घेऊन काम करत आहे. मधमाशीपासून माणसाने काहीतरी शिकणे गरजेचे आहे. मधमाशीला राज्य सरकारने 'राज्य कीटक' म्हणून घोषित करावे, अशी मागणी श्री. हेमंतकुमार डुंबरे यांनी यावेळी बोलताना केली.

पालघर जिल्ह्यातील कोसबाड येथील कृषी विज्ञान केंद्राचे श्री. उत्तम सहाणे म्हणाले की, मधमाशी पालन हा कृषितारक व्यवसाय आहे, हे मान्यच करावे लागेल. निसर्गातील मधमाश्या व कीटकांमुळे पिकांमध्ये आपोआप परागीभवन होत राहील, या भरवशावर शेतकऱ्यांनी आता राहू नये. एकपीक पद्धती, रासायनिक कीडनाशकांचा वाढता वापर, यांत्रिकीकरण, जी.एम. तंत्रज्ञान या प्रकारच्या आधुनिक शेती पद्धतीमुळे मधमाश्यांचे अस्तित्व धोक्यात येत आहे याकडे मात्र कोणाचेही लक्ष नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक तसेच 'बसवंत गार्डन'चे संचालक श्री. संजय पवार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मधमाशी पालनाच्या संदर्भात काम करीत असताना मागील चार वर्षांत चांगला अनुभव आला. 'बसवंत गार्डन'च्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले. साहजिकच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मधमाशी पालनाचा प्रचार मोठ्या प्रमाणात करता आला. देशातील पाहिले 'ॲपि टुरिझम सेंटर' म्हणून 'बसवंत गार्डन' पुढे आले. आज हजारो पर्यटक तसेच शाळा- कॉलेजातील विद्यार्थी, विद्यार्थिनी येथे भेट देऊन मधमाशीच्या विविधोपयोगी कार्याची माहिती घेत आहेत. पुढील काळात वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना आणि मधमाश्यांच्या जातिनिहाय संगोपनाकरिता एकात्मिक कार्यनियोजन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'च्या माध्यमातून मधमाशी पालनाबरोबरच, इतर समाजोपयोगी उपक्रमही आयोजित करत असल्याबद्दल, कृषी विभागाच्या वतीने श्री. संजय पवार यांचा यावेळी सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. ■